**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

---

क्र. कोविमं/माध्य. परीक्षा/ 1461
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक : ०३/ ०९ / २०१८

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा

**विषय : जुलै-२०१८ मध्ये घेणेत आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी)परीक्षेच्या मूळ गुणपत्रिकांच्या वाटपाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **जुलै-२०१८** मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ट झालेल्या नियमित, खाजगी, श्रेणीसुधार, पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका **दि.०६.०९.२०१८** रोजी नेहमीच्या वितरण केंद्रावर हस्तपोहोच देण्यात येत आहेत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरीत करावयाच्या आहेत.

गुणपत्रिका विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन नावांतील स्पेलिंग, विषय इत्यादी सर्व माहिती बरोबर असल्याची व गुणपत्रिकेत विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे. त्रुटी असणारे गुणपत्रक कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. गुणपत्रकात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच गुणपत्रकाची संख्या कमी अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा.

**त्रुटी असणाऱ्या गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत दिनांक ०५.१०.२०१८ पूर्वी मंडळाकडून दुरुस्त करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी.**

**दुरुस्ती प्रस्तावासोबत योग्य ते दुरुस्ती शुल्क तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी प्रमाणित केलेली माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.** तसेच यापूर्वी दुरुस्ती का कळविली नाही याबाबतच्या खुलाशासह जनरल रजिस्टर घेऊन मुख्याध्यापक / प्रतिनिधींनी समक्ष मंडळ कार्यालयात आल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास आपली सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**टीप- आपणास प्राप्त झालेल्या मूळ गुणपत्रिका ह्या आपल्याच शाळेच्या आहेत का याची काळजीपूर्वक खात्री करावी. जर इतर शाळेच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या पाकियत सिलबंद करून त्वरित मंडळ कार्यालयाकडे आपल्या विश्वासू प्रतिनिधीमार्फत समक्ष हस्तपोहोच पाठविण्याची व्यवस्था करावी.**